# महाराष्ट्र लुटणाऱ्यांना सत्तेतून खाली खेचा!- उद्धव ठाकरे

## सुनील खराटेंच्या प्रचारार्थ बडनेरात जाहीर सभा





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.7 )** - बटेंगे तो कटेंगे म्हणत हिंदु-मुस्लीम तेढ निर्माण करणारी भाजप पुन्हा सत्तेत बसण्याची स्वप्ने बघत आहे. हे लोकं महाराष्ट्रातील सगळे उद्योग गुजरातला नेत आहे. हे मोदी, शहांच्या विचारांवर चालणारे राज्य नसून हे स्वाभिमानी लोकांचे राज्य आहे, हे राज्य तोडणाऱ्या आणि लुटणाऱ्या या लोकांना सत्तेतून खाली खेचत सत्तेबाहेर करण्याचे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी केले.

बडनेरा विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ बडनेरा नवी वस्ती येथील आठवडी बाजार प्रांगणात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या जाहीर सभेला उद्धव ठाकरे संबोधित करत होते.

या जाहीर महासभेच्या मंचावर शिवसेना नेते खा.अरविंद सावंत, बडनेरा विधानसभा मतदार संघाचे उमेदवार सुनील खराटे, अमरावती विधानसभा मतदार संघाचे उमेदवार डॉ.सुनील देशमुख, खा. बळवंत वानखडे, माजी खा. अनंत गुढे, रिपाई चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र गवई, राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी आ.प्रदीप वडनेरे, शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी, महानगर प्रमुख पराग गुडधे, आसावरी देशमुख, भीमशक्तीचे पंकज मेश्राम यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

ज्याच्या हातात मशाल तोच आपला खरा उमेदवार असून सुनील खराटे सारख्या सामान्य कार्यकर्त्याला तुमच्या आशीर्वादाची गरज असून तुम्ही मतदानरुपी आशीर्वाद देऊन बहुमताने विजयी कराल असा विश्वास देखील उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

### गाडगेबाबांच्या दशसुत्रीला अनुसरून वचननामा

संत गाडगेबाबांनी दशसुत्री दिली असून एक कुटुंबप्रमुख म्हणून त्यांच्या दशसूत्रीवर आधारित वचननामा तयार केलेला आहे. गाडगेबाबांनी जे संस्कार व विचार दिले त्या संस्कार व विचारला जपण्याचे काम शिवसेनेने केले असल्याचे सांगून काही मिंध्ये हे गाडगेबाबांचे संस्कार व विचार पुसून टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा हल्लाबोल देखील उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर उभारणार असल्याची घोषणा यांनी केली.

### प्रत्यक्ष कृती करून दाखविणार- खराटे

जाहीर सभेत बडनेरा विधानसभा मतदार संघातील उमेदवार सुनील खराटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मी बोलणार नाही तर प्रत्यक्ष कृति करून दाखवणार अशी हमी देत मी खेळाडू आहे, खेळाडू नेहमीच जिद्दीने खेळतो आणि जिंकण्यासाठीच खेळतो या निवडणुकीच्या खेळात सुद्धा आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने जिंकणार असा मला विश्वास असून माझ्या मशाल चिन्हासमोरील बटन दाबून मला प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन सुनील खराटे यांनी जाहीर सभेत केले.





# भाजपने 15 लाख ऐवजी 1500 रुपयांवर बोळवण केली

## उद्धव ठाकरेंची तोफ महायुतीवर धडाडली | यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ वलगाव येथे विराट सभा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.7 )**- नुसत्या निवडणूक आल्या की योजनांचा महापुर आणायचा, मात्र रोजगाराचा पत्ता नाही. जनतेला प्रत्येकी 15 लाख रुपये देण्याचे आश्वासन देणाऱ्या भाजपने जनतेची 1500 रुपयांवर बोळवण केली. विरोधकांना महाराष्ट्र लुटायचा होता म्हणून त्यांनी आमच्याशी गद्दारी केली आणि सरकार पाडले. माझी बहीण यशोमती ठाकूर ह्या वाघीण आहेत,त्या संकट काळात पाठीशी उभ्या होत्या. सत्तेतील तिघे म्हणजे भाऊ-भाऊ, सगळे मिळून महाराष्ट्र खाऊ, अशी यांची ही भाऊबंदकी आहे. आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून बहिणींवर प्रेम दाखविणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी महिलावर झालेल्या अत्याचाराबद्दल ही बोलावे. ही निवडणूक महाराष्ट्र प्रेमी आणि महाराष्ट्र द्रोही यांच्यात होत आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले. आता मात्र दाढीवाला, देवा भाऊ आणि जॅकेटवाल्यांनी राज्य कर्जबाजारी केले असा गंभीर आरोप शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला.

वलगाव येथील यशोमती ठाकूर यांच्या प्रचार्थ आयोजित येथील जाहीर सभेत उद्धव ठाकरे बोलत होते. महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ वलगाव येथे विराट सभा घेण्यात आली. यावेळी व्यासपीठावर छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्र बघेल, खा. अरविंद सावंत, आ. मिलिंद नार्वेकर, काँग्रेस पक्षाचे नेते कुणाल चौधरी, उदय पानसे, महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर, खा.बळवंत वानखडे, रिपाई नेते डॉ. राजेंद्र गवई यांच्यासह अन्य मान्यवरांनी उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना उद्धव ठाकरे यांनी सांगितले की यशोमती ठाकूर ह्या माझ्या मंत्रिमंडळात कर्तबगार मंत्री होत्या, त्यांनी महाराष्ट्र राज्यात चांगले काम केले असून तिवसा मतदारसंघाचा चांगला विकास केला आहे. शेतकरी महिला आणि दुर्बल घटकासाठी यशोमतीने केलेले कार्य प्रशंसनीय आहे. यशोमती सारख्या बुलंद व कर्तबगार नेत्याची राज्याला गरज आहे त्यांना मोठ्या मताधिक्याने आपण विजयी करावं असे आवाहन करून उद्धव ठाकरे यांनी अमरावती जिल्ह्यातील सर्वच मतदार संघात महाविकास आघाडीला नागरिकांची साथ असल्याचे नमूद केले. लोकसभेसारखाच विश्वास विधानसभेतही दाखवावा जेणेकरून येणाऱ्या काळात भ्रष्टाचारी व गद्दारांना त्यांची जागा दाखवून देऊ आणि महाराष्ट्र पुन्हा सुजलाम सुफलाम करू असे त्यांनी प्रतिपादन केले.

### लोकतंत्र व संविधान वाचवा-बघेल
### ये जनता है सब जानती है

शेतकऱ्यांच्या आत्महत्या,महिला वरील अत्याचार, तोडफोडीच राजकारण, वाढती गुन्हेगारी याला कंटाळून महाराष्ट्रातील जनता पुन्हा महाविकास आघाडीला बहुमताने निवडून देतील. सत्तेतील कमिशनखोर आणि चोरांना घरी बसवा. कायदा आणि सुव्यवस्थेचा कोणताही आधार न घेता संविधानाची तोडफोड करणाऱ्या आणि जातीत तेढ निर्माण करणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करा असे आवाहन करून यशोमती ठाकूर यांनी 'ये जनता है सब जानती है' असे सांगून विरोधकांवर चांगलीच तोफ डागली.

# ट्रकच्या धडकेत एक गंभीर

## उतावली फाटा येथील घटना



**महासागर प्रतिनिधी**
**धारणी, ( दि.7 )** - शहरालगत असलेल्या उतावली फाटा येथे एका ट्रकने स्कुटी वाहनाला धडक दिल्याने एक जण गंभीर जखमी झाला. नवीन नागले असे जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. नवीन व त्याचा मित्र कपिल ढिमरेकर हे दोघेही एमएच 27/डीएम 8438 या क्रमांकाच्या स्कूटी वाहनाने ने उतावलीवरून धारणी कडे येत असताना समोरून येणाऱ्या डब्ल्युबी 25/ एल 8725 क्रमांकाच्या आईसर ट्रकने स्कूटी ला जबर धडक दिली. यामध्ये नवीनच्या डोक्याला मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला उपजिल्हा रुग्णालय धारणी येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचाराकरिता मध्य प्रदेशातील बऱ्हानपूर येथे हलविण्यात आले. तर कपिल ढिमरेकर याने वेळेवर मागे उडी घेतल्याने तो थोडक्यात बचावला.

# 4.50 लाख रुपयांची संत्री घेऊन ट्रक चालक फरार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.7 )** - पश्चिम बंगालमधील सिलीगुडी येथे संत्री पोहोचवण्यासाठी ट्रक चालकाला 4 लाख 50 हजार रुपये आणि ट्रकचे आगाऊ भाडे 37 हजार रुपये देऊन पाठविण्यात आले होते. परंतु ट्रकचालकाने माल पश्चिम बंगालला पोहोचवला नाही आणि तो पसार झाला. या घटनेची तक्रार संत्रा व्यापारी अनिरुद्ध अरुण अकोटकर (28, रा. शिरजगाव कसबा) यांनी शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात 6 नोव्हेंबर रोजी दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी ट्रकचालक सियाराम विश्वकर्मा (रा. काधवरिया, पन्ना, मध्य प्रदेश) आणि राकेशकुमार मन्नूकुमार रॉय (रा. पणजी दमोह, सागर, मध्य प्रदेश) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**चालक आणि मालकावर गुन्हा दाखल**

अनिरुद्ध अकोटकर हे त्याच्या वडिलांची ॲग्रो फ्रेश नावाने संत्रा खरेदी विक्री कंपनी चालवीतात. त्यांना 11 ऑक्टोबर रोजी पश्चिम बंगालच्या सिलीगुडी येथे संत्र्यांचा माल पाठवायचा होता. त्यानुसार अनिरुद्ध यांनी हे भाडे ट्रक चालक सियारामला दिले होते. अनिरुद्धने ट्रक क्रमांक सीजी 04/एनयु 7452 मध्ये सियाराम विश्वकर्मा यांना 4 लाख 50 हजार रुपये किमतीचे 480 केशरी कॅरेट आणि ट्रकचे भाडे 37 हजार रुपये दिले होते. मात्र अनेक दिवस उलटूनही पश्चिम बंगालमधील सिलीगुडीमध्ये संत्र्यांची डिलिव्हरी झालेली नाही. त्यामुळे अनिरुध्द यांनी संबंधित व्यवसायीकाला विचारणा केली असता, सदर व्यावसायिकाला सिलीगुडी येथून संत्रा माल मिळत नसल्याची माहिती मिळाली. त्यानंतर अनिरुद्ध अकोटकर यांनी 6 नोव्हेंबर रोजी शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी ट्रकचालक आणि मालक सियाराम विश्वकर्मा, राकेशकुमार रॉय यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# क्रेडिट कार्ड सेवा बंद करण्याच्या नावावर गंडविले

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.7 )** - क्रेडिट कार्डची आंतरराष्ट्रीय सेवा बंद करण्यासाठी व्हॉट्स ?पवर लिंक पाठवून आरोपीने क्रेडिट कार्डमधून 1 लाख 95 हजार 590 रुपये काढून घेतल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी विजय चंद्रभानजी तायडे (वय 57, अर्जुन नगर) यांच्या फिर्यादीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात मोबाइलधारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय तायडे यांना त्यांच्या क्रेडिट कार्डची आंतरराष्ट्रीय सेवा बंद करायची होती. 20 सप्टेंबर रोजी त्यांना गुगलवर एक नंबर शोधल्यावर मिळाला, त्यावर कॉल केल्यावर अज्ञात आरोपींनी आंतरराष्ट्रीय सेवा बंद करण्यासाठी विजय तायडे यांच्या व्हॉट्स ?पवर स्क्क्ष क्रेडिट कार्ड सारखी लिंक पाठवली. त्यानंतर विजय यांना फोन करून माहिती अपलोड करण्यास सांगितले. विजय तायडे यांनी सांगितल्याप्रमाणे माहिती अपलोड केले. त्यानंतर अज्ञात आरोपीने त्यांच्या क्रेडिट कार्डमधून एकूण 1 लाख 95 हजार 590 रुपये काढून घेतले. आपली फसवणूक झाल्याचे

**अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल**

निदर्शनास येताच विजय तायडे यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली. विजय तायडेंच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात मोबाइलधारकाविरुद्ध कलम 318 (4), 319 (2), 66 (क), (ड), आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# तरुणाजवळची एक लाखांची रोख जप्त

## रामपुरी कॅम्प येथे विशेष पथकाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.7 )**- गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीतील रामपुरी कॅम्प येथील राम लक्ष्मण संकुलजवळ एक लाख रुपयांची रोकड घेऊन जाणाऱ्या तरुणाला विशेष पथकाने अटक केली. बुधवारी (दि.6)रात्री 11.30 च्या दरम्यान ही कारवाई करण्यात आली. रोख रकमेबाबत तरुणाकडे चौकशी केली असता तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही, त्यामुळे ही रक्कम जप्त करण्यात आली.

पोलिस आयुक्तालय हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगार, तडिपार आरोपींचा शोध, जुगारावर छापा, आणि निवडणुका लक्षात घेता रोख रकमेच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथकाची गाडगेनगर पोलिस ठाणे परिसरात पेट्रोलिंग सुरू होती. यावेळी रामपुरी कॅम्प येथील रामलक्ष्मण संकुलजवळ एक तरुण कारच्या डिक्कीत मोठी रोकड घेऊन जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. विशेष पथकाने तातडीने घटनास्थळ गाठून संशयीत तरूण करण हरपाल पाहेवानी (वय 24, अग्रवाल टॉवर, विलास नगर, अमरावती) याच्याकडे चौकशी केली. त्याच्या मोपेड वाहनाची तपासणी केली असता डिक्कीत एक लाख रुपयांची रोकड दिसली. निवडणुकीच्या दृष्टीने या रकमेबाबत करण पाहेवानी याला विचारणा केली असता, त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत, तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्यामुळे विशेष पथकाने रक्कम जप्त करून गाडगेनगर पोलिसांकडे जमा केली.


# अचलपूर मतदारसंघात सर्वाधिक वेळा अपक्षांचाच झेंडा

**अपक्ष 6, काँग्रेस समर्थीत अपक्ष 1, काँग्रेस 3, भाजप 2, भाकप 1 वेळा विजयी**

## मतदारांचा अपक्षांवरच अधिक विश्वास | विधानसभेच्या पहिल्याच निवडणुकीत अपक्षाचा विजय

**बादल डकरे**
**चांदुर बाजार,( दि.7 )**- अचलपूर विधानसभा मतदारसंघात सन 1962 ते 2019 या कालखंडात, एकूण 13 वेळा विधानसभेच्या निवडणूका झाल्या. ज्यामध्ये मतदारांनी सर्वाधिक वेळा अपक्षांवर विश्वास टाकून त्यांच्याकडे मतदार संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविली आहे. सन 1962 मधील विधानसभेच्या पहिल्याच निवडणूकीत येथील मतदारांनी अपक्ष उमेदवाराला विजयी केले होते. सलग चार वेळा बच्चू कडू यांना निवडून देत येथे मतदारांनी हॅट्रीक केली आहे. त्यामुळे येथील मतदारांवर अपक्षांच्या राजकीय विचारसरणीचा पगडा असल्याचे जाणवत आहे. तसेच राष्ट्रीय पक्षांपैकी काँग्रेसला फक्त तिनदा, भाजपला दोनदा, तर कम्युनिस्ट पक्षाला एकदाच विजय संपादन करता आला.




### 20 वर्षानंतर काँग्रेस सत्तेत

सन 1999 च्या निवडणूकीत तब्बल 20 वर्षा नंतर मतदारांनी, हा मतदारसंघ काँग्रेसकडे सोपविला. या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार म्हणून वसुधा देशमुख यांनी, अपक्ष बच्चू कडू यांच्यावर मात करून विजय मिळविला होता. या निवडणुकीत वसुधा यांना 35 हजार सहा मते, तर कडू यांना 32 हजार 775 मते मिळाली होती.

### भाजपकडून दोनदा अचलपूर सर

मतदारांनी सन 1990 व 1995 अश्या दोन विधानसभा निवडणुकीत भाजप ने अचलपूरचा किल्ला सर केला. या दोन विधानसभासाठी, भाजपच्या विनायकराव कोरडे यांना आपली पसंती दिली. 1990 मध्ये त्यांनी काँग्रेसचे दत्तात्रय मेटकर यांचा पराभव केला होता. तर 1995 मध्ये अपक्ष डॉ. सुरेश ठाकरे यांना पराभूत केले.

### वाटाणे पहिले अपक्ष

विधानसभेच्या 1962 च्या पहिल्याच निवडणुकीत अपक्ष उमेदवार ए.एस.वाटाणे 30 हजार 184 मते घेऊन विजयी झाले होते. त्यांनी आपले प्रतीस्पर्धी काँग्रेसचे के.जी.देशमुख यांचा पराभव केला होता. तसेच 1967 च्या विधानसभा निवडणुकीत, काँग्रेसचे एन.एस.उर्फ भैय्यासाहेब देशमुख हे 31 हजार दोन मते घेऊन विजयी झाले होते. त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचे सुदाम देशमुख यांचा पराभव केला होता. 1972 मध्येही मतदारांनी काँग्रेसच्या भैय्यासाहेब देशमुख यांची पुन्हा निवड केली. यावेळी ते 48 हजार 971 मते घेऊन विजयी झाले होते. त्यांनी आरपीआय च्या किसन वानखडे यांचा पराभव केला होता. सन 1978 च्या निवडणुकीत वामन उर्फ बाबासाहेब भोकरे, काँग्रेस आय समर्थीत अपक्ष म्हणून विजयी झाले होते. त्यांना 24 हजार 178 मते मिळाली होती. भोकरे यांनी सुदाम देशमुख यांच्यावर फक्त 732 मतांनी निसटता विजय प्राप्त केला. यावेळी सुदाम काका यांना 23 हजार 446 मते मिळाली होती.

### सन 1980 मध्ये भाकपचा झेंडा

सन 1978 नंतर लगेचच दोन वर्षातच विधानसभा भंग होऊन, 1980 मध्ये पुन्हा विधानसभेच्या निवडणूका झाल्या होत्या. या निवडणुकीत मात्र सुदाम देशमुख यांनी कम्युनिस्ट पक्षाचे तिकीटावर लढत, आपले तत्कालीन प्रतिस्पर्धी काँग्रेस आय चे बाबासाहेब भोकरे यांचा पराभव केला. सुदामकाका यांना 47 हजार 989 इतकी मते मिळाली होती. 1985 च्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिलेले, सुदाम देशमुख यांनाच पुन्हा दुसऱ्यांदा निवडून दिले. या निवडणुकीत त्यांनी काँग्रेसच्या सुनिल देशमुख यांचा पराभव केल. या निवडणुकीत सुदाम देशमुख यांना 38 हजार 211 मते, तर सुनील देशमुख यांना 20 हजार 123 मते प्राप्त झाली होती.

### पुन्हा बबलू देशमुख लढतीत

आता 2024 च्या विधानसभेमध्ये बबलू देशमुख पुन्हा एकदा बच्चू कडू यांच्या विरोधात काँग्रेसकडून उभे आहे, तर भाजपकडून प्रविण तायडे यांचीही उमेदवारी आहे. यंदा बच्चु कडू पुन्हा विजयी होणार की, त्यांचा विजयी रथ रोखल्या जाणार हे पाहण्यासारखे राहील.

### सन 2004 पासून बच्चू पर्व

यानंतर सन 2004 च्या निवडणुकीत बच्चू कडू यांनी वसुधा देशमुख यांचा पराभव केला. त्यानंतर या मतदारसंघात बच्चू पर्व सुरु झाले. त्यांनी तब्बल 15 वर्षानंतर या मतदारसंघात अपक्षाच्या विजयाचा झेंडा फडकविला. यानंतर मात्र आजतागायत आ.कडू यांनी, मतदारसंघात विजयाची हॅट्रीक साधत अपक्षाच्या राजकारणाचा दबदबा निर्माण केला. आपली हॅट्रीक साधतांना आ. कडू यांनी 2004, 2009, 2014 व 2019 या निवडणुकीत तर 2004 व 2009 सलग दोनवेळ कडू यांनी वसुधा देशमुख यांना पराभूत केले. सन 2014 मध्ये आ.कडू यांचे कडून पराभूत झालेल्या, भाजपच्या अशोक बनसोड यांना 49 हजार 64 मते मिळली होती. तर काँग्रेसचे उमेदवार बबलू देशमुख यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. तर 2019 ला बच्चू कडू यांना बबलू देशमुख यांनी थेट लढत दिली. यावेळी दुसऱ्या क्रमांक वर असलेल्या बबलू देशमुख यांना 72256 इतके मत मिळले होते.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मेळघाट विधानसभा मतदार संघात होणारं बहुरंगी लढत

**दिनेश सोनोने**

**अमरावती,( दि.7 )-** मेळघाट विधानसभा मतदार संघात महायुतीचे भाजपाचे केवलराम काळे, प्रहार चे राजकुमार पटेल, महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. हेमंत चिमोटे, अपक्ष उमेदवार ज्योती सोळंके व रमेश तोटे सह एकूण पंधरा उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहे. महायुती महविकास आघाडी व प्रहारमध्ये जोरदार लढत होण्याची चर्चा सध्या गल्ली पासून चहाच्या टपरी पर्यंत दिसत आहे.

भाजपाने तिकीट नाकारल्याने ज्योती सोळंके यांनी आपली अपक्ष उमेदवारी दाखल केली. तसेच कामगारांना विविध योजना मिळवून देणारे रमेश तोटे यांनी वंचित आघाडीचा सहारा घेत आपली उमेदवारी कायम ठेवली आहे. त्यामूळे हे दोन्ही अपक्ष उमेदवार कुणाचे गणित बिघडवणार आणि कुणाच्या डोक्यावर विधानसभेचा मुकुट देणार ? याची उत्सुकता मतदारांना लागली आहे. मेळघाट विधानसभा मतदार संघात मोठी लढत होत असल्याने






संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या मतदार संघात मागील निवडणुकी सारखी परिस्थिती निर्माण झाली असून मात्र खरी लढत भाजपाचे केवलराम काळे प्रहारचे राजकुमार पटेल व काँग्रेस चे डॉ.हेमंत चिमोटे, अपक्ष ज्योती सोळंके व अपक्ष रमेश तोटे अशी बहुरंगी लढत होणार असल्याचे चित्रं स्पष्ट दिसत आहे. धारणी तालुक्यात मतदारांची संख्या जास्त असल्याने मतदारांचा कल स्थानिक उमेदवाराकडे आहे. राजकुमार पटेल हे आधीपासून सर्वांचे परिचित असल्याने तसेच ज्योती सोळंके व रमेश तोटे हे देखील धारणीचे आहेत त्यामूळे त्यांचेकडे सुद्धा मतदारांचा कल आहे. कोण कोणाचे गणित बिघडविणार हे सांगता येत नाही, तसेच भाजपाचे केवलराम काळे यांचे पक्षांचे मते भाजपच्या बंडखोर नेत्या ज्योती सोळंके घेणार काय असा प्रश्न निर्माण होत आहे. त्यांचेसोबत भाजपाचे काही कार्यकर्तेही असल्याची माहिती आहे. हेमंत चिमोटे यांचे मते अपक्षांमध्ये विभाजित होत असल्याची चर्चा आहे. त्यामूळे कोण बाजी मारणार हे अद्यापही सांगता येत नाही.

केवलराम काळे व राजकुमार पटेल हे दोघेही माजी आमदार असल्याने यांना सर्वच स्तरातील मतदार ओळखतात. त्यांच्या मागील कामांचा आढावा घेताना लोकं दिसत आहेत. मेळघाट विधानसभा मतदार संघात राजकुमार पटेल यांनी मागील पंचवार्षिक मध्ये कोट्यवधी रुपयाचे कामे आणले, त्यामूळे त्यांच्या कामाची जोरदार चर्चा आहे. त्याचप्रमाणे मेळघाट मतदार संघ भाजपचा गड राहिला आहे. लोकसभेत या मतदार संघात नवनीत राणा यांना 22 हजार मतांची आघाडी मिळाली होती. त्यामूळे केवलराम काळे यांना नवनीत राणा यांचाही भक्कम साथ व समर्थन असल्याने व माजी आमदार प्रभूदास भिलावेकर यांनी माघार घेतल्याने त्यांची बाजू बळकट आहे. तसेच ज्योती सोळंके यांचे गेल्या एक वर्षापासूनचे सामाजिक कार्य पाहता त्यांचे समर्थक मोठया प्रमाणात आहेत. त्यांचे वर्चस्व कायम असल्याने त्या जोरदार लढत देणार असल्याचे चित्र दिसत आहे. त्याचप्रमाणे रमेश तोटे यांनीही कामगारांचे प्रश्न व योजना मिळवून दिल्याने ते जबरदस्त टक्कर देऊ शकतात. एकेकाळी मेळघाट विधानसभा मतदारसंघ काँग्रेसच्या वर्चस्वाखाली होता आणि आताही मेळघाट मध्ये युवा खंबीर नेतृत्व असल्याने कार्यकर्तेची माळ जुळत आहे. म्हणून डॉ. चीमोटे हे सुध्दा तुल्यबळ लढत देणार असल्याची चर्चा आहे.

# जिल्ह्यात गुरुवारपासून तीन दिवस गृहमतदान

## ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगांना सुविधा

## 2,862 मतदार मतदानासाठी पात्र



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.7 )-** निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 85 वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे. जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात गुरूवार, दि. 14 नोव्हेंबरपासून गृहमतदानास सुरूवात होणार आहे. सलग तीन दिवस शनिवार, दि. 16 नोव्हेंबरपर्यंत हे मतदान होणार आहे.

निवडणूक आयोगाने 85 वर्षावरील नागरिक आणि दिव्यांगांना घरून मतदान करण्याची सोय दिली आहे. यासाठी त्यांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत 12 डी फॉर्म भरून द्यावा लागला. या फॉर्मची तपासणी केल्यानंतर जिल्ह्यातील 2 हजार 862 मतदार पात्र गृहमतदानासाठी ठरले आहेत. 85 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांमध्ये धामणगाव रेल्वे मतदारसंघात 360, बडनेरा 192, अमरावती 221, तिवसा 484, दर्यापूर 273, मेळघाट 150, अचलपूर 388, मोर्शी 354 असे एकूण यात 2 हजार 422 ज्येष्ठ नागरिक मतदार मतदान करणार आहेत.

त्यासोबतच धामणगाव रेल्वे मतदारसंघात 52, बडनेरा 53, अमरावती 82, तिवसा 47, दर्यापूर 48, मेळघाट 22, अचलपूर 67, मोर्शी 69 असे एकूण यात 440 दिव्यांग मतदार मतदान करणार आहेत.

### 139 चमू करणार गृहमतदान

गृहमतदानासाठी विधानसभानिहाय चमू तयार करण्यात आली आहे. धामणगाव रेल्वे मतदारसंघात 20, बडनेरा 25, अमरावती 19, तिवसा 15, दर्यापूर 15, मेळघाट 14, अचलपूर 15, मोर्शी 16 अशा 139 गृहमतदानाची नोंदणी केल्या मतदारांच्या घरी जाऊन पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करून घेणार आहे.

# तिवसा येथील जप्तीतील मुद्देमाल वैध

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 ) -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-2024 साठी आदर्श आचारसंहिता सुरू आहे. आचारसंहिता दरम्यान 39 - तिवसा मतदार संघात निगराणी पथक तयार करण्यात आले आहे. ही पथके नियमित वाहनांची तपासणी करतात. तपासणी करताना त्यांना 5 नोव्हेंबर 2024 रोजी बोलेरो या चारचाकी वाहनाची तपासणी केली असता यात मुद्देमाल आढळून आला. यात 229.614 किलोग्रॅम चांदी व 4.392 किलोग्रॅम सोने आढळून आले. यावेळी वाहनासह असलेले कर्मचारी याबाबत समाधानकारक माहिती देऊ शकले नाहीत. हे वाहन सिक्वेल ग्लोबल प्रेशिअस लॉजिस्टिक्स या कंपनीचे असल्याचे कळले.

यानंतर या कंपनीला लेखी नोटीस व दूरध्वनीद्वारे आपली खरेदी पावती व आवश्यक सर्व दस्ताऐवजासह लेखी नोंद देण्याबाबत कळविण्यात आले. त्यानंतर या कुरिअर कंपनीचे सेल्स मॅनेजर संतोष खुशालसिंग धोटियाल व जितेंद्र नरेश पवनीकर यांनी लेखी म्हणणे व आवश्यक वैध दस्तावेज पोलीस अधिकारी, कार्यकारी दंडाधिकारी तसेच अन्य संबंधितांच्या सक्षम सादर केले. तसेच वाहनाचे वजनही इलेक्ट्रॉनिक वजन काट्यावर केले असता योग्य आढळून आले. याबाबतचा सर्व दस्तावेज व अहवाल पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा तक्रार समितीचे अध्यक्ष संजिता मोहोपात्र यांच्याकडे सादर करण्यात आले असल्याची माहिती 39 -तिवसा विधानसभा मतदार संघातील सहाय्यक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे .

# गळफास घेऊन वृध्देची आत्महत्या

**धारणी-** येथून जवळच असलेल्या ग्राम सावऱ्या येथील लखीबाई गोंडूजी शेळके (वय 60 वर्ष) या महिलेने घराजवळील गाईच्या गोठ्यात रात्री 9 वाजताच्या दरम्यान गळफास घेऊन आत्महत्या केली. लखीबाई शेळके यांच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटलांनी धारणी पोलिसांना घटनेची माहिती दिली. ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉंस्टेबल व कर्मचारी यांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला.

# मतदानासाठी 20 नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी

**महासागर प्रतिनिधी**


**अमरावती,( दि.7 ) -** भारत निवडणूक आयोगाने 15 ऑक्टोबर 2024 रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सार्वत्रिक-2024चा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीचे मतदान दि. 20 नोव्हेंबर, 2024 रोजी होणार आहे. या निवडणुकीमध्ये 18 वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी लोकप्रतिनिधित्व कायदा, 1951 मधील कलम 135 (ब) नुसार उद्योग, ऊर्जा, कामगार व



खनिकर्म विभागाच्या दि. 24 ऑक्टोबरच्या शासन परिपत्रकानुसार हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात 20 नोव्हेंबर रोजी मतदान करण्यास सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. या दिवशी मोठ्या संख्येने मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, औद्योगिक उपक्रमात किंवा इतर कोणत्याही आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या आणि राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाईल. सदर सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना इत्यादींना लागू राहील.

# नरेंद्रजी तिखिले यांचे निधन



**अमरावती-** डॉ. संजय तिखीले यांचे चुलते नरेंद्र राजारामजी तिखिले जडीबुटी व किराणा व्यावसायीक यांचे 73 व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, 2 मुले 1 मुलगी सुना नातवंडे बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# 60 गावात डॉ. निलेश विश्वकर्मांचा झंझावती प्रचार



## डोअर टू डोअर प्रचाराने मतदारांचा प्रचंड प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,( दि.7 )-** वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.निलेश विश्विकर्मा यांनी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील जवळपास 60 गावे पायदळी तुडवित जनसंपर्क दौरा केला आहे. ते डोअर टू डोअर प्रचार करित असल्याने त्यांना मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या प्रचार दौर्यारदरम्यान मतदारांनी त्यांच्यासमोर ठेवलेल्या व्यथा त्यांनी ऐकून घेत निवडून आल्यास तातडीने तोडगा काढण्याचे आश्वाकसन विश्वकर्मा यांनी दिले.

बहुजन विकास आघाडीचे उमेदवार डॉ.निलेश विश्वनकर्मा यांनी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील हिंग्लासपूर, धानोरा, ढवलसरी, धारपड, नांदुरा, धानोरा फसी, जयसिंगा, सेलू, वाटपूर, जनुना ,जावरा, चांगपूरा, जसापूर, जामखेड व चोर माहुली या गावात प्रचार रॅली काढून मतदारांच्या भेटी घेतल्या. डॉ.निलेश विश्वाकर्मा यांनी निवडून आल्यावर मतदार संघात 40 एकराचे राष्ट्रीय विद्यापीठाची निर्मिती, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे या तालुक्यात 100 खाटांचे रुग्णालय, जागतिक स्तरावरील व्यापारांचा समावेश शेतकर्या0साठी उत्तम बाजारपेठ, गरजु महिलांच्या हाताला काम, युवकांना रोजगार असे मुद्दे मतदारांपुढे मांडले. जिल्हा परिषदनुसार उद्योगाची उभारणी, 28 एकरात इनडोअर आणि आऊटडोअर खेळासाठी स्वतंत्र क्रीडा विद्यापीठाची निर्मिती, महिलांच्या सुरक्षा, युवकांना रोजगार असे कामे करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. मतदार संघात घरकुलाचा प्रश्न अत्यंत कठीण झाला आहे. अनेकांना अद्यापही घरकुल मिळाले नाही. मी निवडून आल्यावर एका वर्षात एकाचेही घरकूल शिल्लक ठेवणार नाही असा विश्वा्स मतदारांना डॉ. निलेश विश्वककर्मा यांनी यावेळी दिला. तसेच लग्नसमारंभासाठी गरिबांना सार्वजनिक मंगलकार्यालयाची स्थापना व पर्यटन क्षेत्र विकसित करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. प्रचार रॅली दरम्यान नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील अवधुत आखरे, अजय पाटील, सतिश गोफनारायण, डिगांबर तिडके, रोहन मोहोड, धर्मेंद्र मोहोड, प्रदीप वाघमारे, धिरज इंगोले, अमोल पाटील, विकास बागडे, रवी डोंगरे, आकाश ठोंबरे, निर्मला मोहोड, सविता दुपारे, सविता रंगारी, वर्षा गायकवाड, सुजाता मोहोड, माया वाडेकर यांच्यासोबत असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# अंबापाटी येथे 'एक दिया शहीदों के नाम'

## विरगती मिळालेल्या जवानांना दिली श्रध्दांजली



**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा ,( दि.7 )-** तालुक्यातील अंबापाटी येथे शनिवार (दि.2) रोजी सीमेवर शहीद झालेल्या भारतीय वीर सैनिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता 'एक दिया शहीदों के नाम' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावातील ज्येष्ठ नागरिक ओकांरराव खडके उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जामली आर येथील रहिवासी सैनिक जवान जयंत पाटील, अंबापाटी ग्रामपंचायतच्या सरपंच कुसमा कास्देकर, राजु कास्देकर, गंगारामजी गायन, रामाजी दलाले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याच प्रमाणे सोनुजी खडके, तंटामुक्त अध्यक्ष गट ग्रा. पं. अंबापाटी कृष्णा खडके, सरपंच सदस्य गंगाबाई जामूनकर, गंगाबाई जामूनकर, फुलाबाई उमरकर, रामचंद्रजी पटवे, तुकाराम गायन, राजाभाऊ खडके, रतीराम कास्देकर, दयाराम बेलसरे, भोजा भाकरे, लक्ष्मण खडके, विनायक भाकरे, जवान सैनिक परशराम खडके, शेख गणी शेख सत्तार, मोहन खडके, रुक्मिणी परशराम खडके (महिला पोलीस) यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्थान भूषविले. सर्व प्रथम उपस्थित मान्यवर आणि गावातील जेष्ठ, युवक आणि माता, भगिनी या प्रत्येकांनी आप-आपल्या घरून आणलेल्या दिव्यांचे प्रज्वलन केले आणि सर्वांनी दोन मिनिटं, मौन धारण करून शहिद वीर सैनिकांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी भारत माता की जयज., शहिद वीर जवान अमर रहे.. नारे देण्यात आले. तद्नंतर मान्यवरांचे पुष्पुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तद्नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पवन सुर्जेकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक शिवकुमार पटवे आणि तर आभार प्रदर्शन कृष्णा खडके यांनी केले.

### त्यांचे बलिदान विसरु नका!

यावेळी यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले विचार प्रकट केले. भारताचे सैनिक कसे आपले प्राणाचे बलिदान देऊन देशाची रक्षा करतात. त्यांच्या बलिदानाचा विसर आपल्याला पडू नये, याकरिता या दिवाळीच्या मुहूर्तावर आपण त्या शहिदांच्या आठवणीत एक दिवा लावून त्यांनी केलेल्या सर्वस्वी बलिदानाला आपण त्यांच्या आठवणीत एक दिवा लावायलाच पाहीजे. त्यांच्या बलिदानाचा व कर्तव्याचा हा सन्मान आहे. गावातील युवकांनी स्वत:हून पुढे येत सैनिक भरतीमध्ये सहभाग घ्यायला पाहीजे. देशाच्या प्रत्येक नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण व्हावी असेही आवाहन यावेळी मान्यवरांकडून करण्यात आले..

# महाराष्ट्राच्या सेवेसाठी एक मत प्रहारला द्या!

## बच्चू कडू यांनी मतदारांना घातली साद | मतदारांच्या हस्ते केले प्रचार कार्यालयाचे लोकार्पण





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.7 ) -** अमरावती जिल्ह्यातील अचलपूर व चांदूर बाजार ही संतांची भूमी आहे. या भूमिने आम्हाला सेवा हेच कर्म असल्याचे शिकविले. या सेवेची गंगा महाराष्ट्राभर पोहोचवून महाराष्ट्राची सेवा करण्याची संधी देण्याकरिता केवळ एक मत प्रहार ला द्या, अशी साद ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी मतदार संघातील मतदारांना घातली. चांदूर बाजार स्थित आनंद सभागृह येथे प्रहारचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांच्या प्रचार कार्यालयाचे उपस्थित मतदारांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटनाप्रसंगी बच्चू कडू बोलत होते.

जनसेवेचा वसा जोपासणाऱ्या बच्चू कडू यांनी आपल्या याच कार्यकर्तुत्वाच्या भरवश्यावर सलग चार वेळा अचलपूर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. आरोग्य, पर्यावरण, दळणवळण आणि सेवा या गोष्टींना प्राधान्य देत असल्यानेच बच्चु कडू जनतेच्या गळ्यातील ताईत बनलेले.

त्यांनी पुन्हा एकदा आपल्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन एका सामान्य माणसाच्या हाताने करुन या मतदारसंघातील मतदारच आपली खरी ताकद असल्याचे दाखवून दिले. उद्घाटनाप्रसंगी बारी समाजाचे नेते अशोक वसुले, जयकुमार चर्जन, जयंतराव गवई, गौतम गुडदे, जितू दुधाने, राजेंद्र भुगुल, रहमान, राजेंद्र याऊल, शैलेश निरगुडे, हेमंत तडस, मंगेश देशमुख, संतोष किटुकले, राजेंद्र गायकी, घोडे काका, लतीफ खान, बंडू कुयटे यांच्यासह प्रहार पक्षाचे पदाधिकारी, असंख्य प्रहार कार्यकर्ते व मतदार उपस्थित होते.

### बच्चुं च्या पाठीशी मातृशक्ती

प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित मातृ शक्तीने बच्चू कडू यांचे औक्षवण करून त्यांना विजयाचा आशीर्वाद दिला. बच्चू कडू यांनी गेल्या वीस वर्षात महिलांकरिता मोठे कार्य केले. अनेक महिलांना विविध योजनांचा लाभ मिळवून देत न्याय दिला. त्यामूळे बच्चू कडू यांची बॅट घराघरात पोहोचून विधानसभा निवडणुकीत बॅटने मोठी फटकेबाजी करीत धावांच्या रूपाने मतांचा डोंगर उभा करणार असा निर्धार यावेळी महिलांनी केला.

### राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रहारमध्ये

निवडणुकीच्या काळात अचलपुर मतदार संघातील कॉंग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी पक्षाला रामराम करत प्रहार जनशक्ती पक्षात प्रवेश करून बच्चू कडू यांचे हात बळकट केले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अचलपूर तालुकाध्यक्ष गजानन तट्टे यांनी सुद्धा शेकडो कार्यकर्त्यांसह प्रहारमध्ये प्रवेश केला. यामुळे अचलपूर तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला खिंडार पडली असल्याचे चित्र आहे.


### पंजाने चढविला कमळाचा मुखवटा

बच्चु कडू यावेळी जनतेला संबोधित करताना म्हणाले की, गेल्या चार निवडणुकीत आपण सर्व मतदारांनी जी मोठी ताकद माझ्यामागे उभी केली, त्याच ताकदीमूळे भाजप आणि कॉंग्रेसने हातमिळवणी करुन मतदारांना मुर्ख बनविण्याचा धंदा सुरु केला आहे. भाजपने यावेळी डमी उमेदवार दिल्याचा धक्कादायक दावाही यावेळी बच्चू कडू यांनी केला, त्यांनी सांगितले की, पंजाने कमळाचा मुखवटा चढविला आहे. समोर पंजा दिसत असला तरी मागून त्याला कमळ धक्का देत आहे, परंतू या दोघांचेही डिपॉझिट जप्त होईल असा आत्मविश्वास देखील बच्चू कडू यांनी व्यक्त केला.

### महाराष्ट्रभर रुग्णसेवकांची फौज साकारणार

शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, कामगार व कष्टकरी घटकाची हक्काची आघाडी म्हणून परिवर्तन महाशक्ती आघाडी ही महाराष्ट्रात पुढे आली आहे. या आघाडीच्या माध्यमातून प्रहार महाराष्ट्रभर रुग्णसेवकांची फौज निर्माण करणार असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. बदल व परिवर्तनासाठी सर्व मतदारांनी परिवर्तन महाशक्ती आघाडी व प्रहारच्या मागे उभे राहून आपली खंबीर ताकद पाठीशी उभी करावी असे आवाहन देखील यावेळी बच्चू कडू यांनी केले.

# कापुस वेचणीस मजुरांची वानवा





**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.7 ) -** सध्या शेतशिवारांमध्ये हाच कापूस निघाला असून तो वेचण्याची तयारी सुरू झाली आहे. ही वेचणी सुरू करण्यापूर्वी जो काही विधी केला जातो, सीतादही आटोपली मात्र दिवाळीचा काळ असल्याने सितादही नंतरचा वेचणीस आलेला कापुस वेचणीस मजुर नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहे.

सोयाबीनच्या कापणी करीता नजीकच्या राज्यातुन मजुर आला होता, तो ही दिवाळीनिमीत्ताने निघुन गेला. सध्या महीला मजुर दिवाळी मुळे आपल्या माहेरी गेला आहे. विजयादशमीच्या काळात परतीचा पाऊस बरसला असता पक्व झालेली कापुस बोंडं पावसामूळे लगेच फुटले असता पर्‍हाटीवर कापुस बोडं दिसुन येतात. सध्या शेतकरी रब्बी पिकांच्या पेरणीत व्यस्त असल्याने घरी कापुस वेचुन नेण्याच्या तयारीत आहे. मात्र दुर्दैवाने महीला मजुरांची वानवा असल्याने कापुस वेचणी करीता